
F-00303829(SLP)

# काव्यप्रेमी...

दिवाळी अंक २०२१



# काव्यप्रेमी...

दिवाळी अंक २०२१

वर्ष : चौथे

*संपादक*

आनंद घोडके । कालिदास चवडेकर

*संकलक*

पी. नंदकिशोर । दीपक सपकाळ

*संपादन सहाय्य*

राज भिंगारे
कृष्णा शिंदे
सौ. आशा पाटील
सौ. जया नेरे
राष्ट्रपाल सावंत
भाऊसाहेब सोनवणे
संदीप वाघोले
प्रमोद बाविस्कर
सत्येंद्र राऊत
रामदास देशमुख
श्याम स्वामी
भाऊसाहेब कोळेकर


*प्रकाशक*

काव्यप्रेमी शिक्षक मंच®

*मुखपृष्ठ*

सौ. ज्योत्स्ना घोडके, सोलापूर

*अक्षरजुळणी व मुद्रक*

ईमॅजिनेशन डिझाईन मिडीया, सोलापूर - ९२८४ ५११ ५६३

*प्रकाशन दिनांक*

दिवाळी पाडवा, २०२१

*स्वागत मूल्य*

₹ २५१/-



या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad


## अनुक्रमणिका


**कथा** (पृष्ठ क्र. १ ते २८)

हरभऱ्याचं गठुडं - प्रा. संतोष बोंगाळे ❋ **भूक** - सौ. वीणा जोशी ❋ **सत्तर रुपये** - श्रीमती माणिक नागावे ❋ **क्रांती** - महेश रायखेलकर ❋ **रिकामं घरटं** - प्रमोद बाविस्कर ❋ **विश्वासघात** - वर्षा भांदर्गे ❋ **मशाल** - सौ. रंजना कराळे ❋ चुकले माझे - सौ. मालती सेमले ❋ आभार मानायचे राहून गेले - सौ. विजेता चन्नेकर ❋ **गुणवंत शिक्षक** - सौ. मृदुला राजे ❋ डोळ्यात साठवलेले स्वप्न - सुप्रिया दापके ❋ **वृद्धाश्रम** - सौ. मनीषा आवेकर ❋ **पुनर्भेट** - विजय फडणीस ❋ **नि:शब्द** - सौ. रेखा होवाळे ❋ **भुताची भेट** - आबासाहेब घावटे ❋ **जांगळगुत्ता ...** - चारुदत्त मेहरे ❋ **गुरुदक्षिणा** - रामहरी पंडित ❋ **टिकली बायो** - राष्ट्रपाल सावंत ❋ **सोनेरी क्षितिज** - सौ.पल्लवी पाटील ❋ **भूक** - प्रा. अरूण जोशी ❋ **प्राक्तन** - बाबू घाडीगांवकर

**लेख** (पृष्ठ क्र. २९ ते ६३)

**माझे स्वप्न** - हणमंत पडवळ ❋ **कोरोना : एक बिकट संकट** - सौ. सविता धर्माधिकारी ❋ **घराघरात असणारा बबड्या शोधायला हवा** - आश्विनी धाट ❋ **कोरोना आणि मी** - डॉ. सौ. वसुधा आठवले ❋ **अभिमान आहे स्त्री असण्याचा** - श्रीम. सुदर्शना चौरे ❋ **काव्यप्रेमी शिक्षक मंचने आम्हाला काय दिले** - श्रीमती विणा विटकर ❋ **देऊळ** - निशा डांगे / नायगांवकर ❋ **निसर्ग चक्र आहार आणि आपली संस्कृती** - रंजना लसणे ❋ **भय इथले संपत नाही** - अंजली श्रीवास्तव ❋ **स्त्री काल आणि आज** - श्रीमती सुलभा खुळे ❋ **महिलांची सद्यस्थिती** - डॉ. सत्येंद्र राऊत ❋ **देव्हाऱ्यातील खरे देव** - सौ. राजश्रीताई मिसाळ-ढाकणे ❋ **तो पहिल्यासारखा येत नाही** - राजेश साबळे ❋ **संस्कारांची शिदोरी** - सौ. ऋतुजा गवस ❋ **आनंद पर्व** - सौ. प्रतिभा जगदाळे ❋ **कोरोना काळातील मुलांच्या शिक्षणाची व्यथा** - सौ. ज्योती शिंदे ❋ **मर्यादा आणि बंधने** - सौ. निशा खापरे ❋ **फुलं** - सौ. मुग्धा कुळये ❋ **सांगा कसं जगायचं** - हेमांगी बोंडे ❋ **महात्मा बसवेश्वर** - प्रा. अपर्णा कल्लावार ❋ **शाहू महाराज** - खाजाभाई बागवान ❋ **समरसतेच्या कार्यात समरस झालेले डॉ. प्रसन्न पाटिल** - डॉ. मिलिंद शेजवळ ❋ **देशातील पहिली महिला कुस्तीपटू -ममता पहिलवान** -रणजित पवार ❋ **चिमणीचं आजीला पत्र** -श्रीम. सरला पाटील ❋ **बाप्पास पत्र** -कल्पना देशमुख ❋ **संवाद** -सौ. जस्मिन शेख ❋ **सुशिक्षित स्त्री संसारी** -श्रीम. मिनल चवरकर ❋ **काव्यप्रेमी शिक्षक मंच अविरत वाहणारा निर्मळ आणि शुभ्र असा खळाळता झरा** - अरविंद म्हेत्रे ❋ **स्त्री शक्ती नमन तुला** -सौ. अनिता मेस्त्री ❋ **आठवणीतील नेपाळ** -सौ. ज्योत्स्ना घोडके

**हिंदी** (पृष्ठ क्र. ६४ से ६६)

जान है तो जहाँ है । - दीपक सपकाल ❋ **संस्मरण** - वैशाली गोमकाळे ❋ **पहाड़** -विशाल अंधारे ❋ दिया -स्वाती रूद्र ❋ **गुड़ियां** - कविता कठाणे

**काव्यधारा** (पृष्ठ क्र. ६७ ते ९४)

राजेंद्र माळी ❋ राज भिंगारे ❋ राजेंद्र वाणी ❋ महेश राजूरकर ❋ श्रीमती दीपमाला खडके ❋ सौ. सीमा भांदर्गे ❋ सौ. राधिका कांबळी(नम्रता परब) ❋ श्रीमती प्रमिला सेनकुडे ❋ सौ. शैला चेडे (माळोकार) ❋ सोमनाथ पुरी ❋ सौ. ज्योती नाईकवाडे-लांडगे ❋ अमिता घाटोळ ❋ सौ. शैला गिरनारकर ❋ हेमलता देशपांडे ❋ विजो (विजय जोशी) ❋ माधुरी चौधरी ❋ विजयालक्ष्मी राऊत-गोरे ❋ खुशाल गुल्हाणे ❋ अर्चना मुरूगकर ❋ कैलास दिनकर ❋ प्रा. अशोक शिंदे ❋ शरद सिरस ❋ सरिता रामटेके ❋ कृष्णा निमट ❋ जमालोद्दिन शेख ❋ कैलास गवळी ❋ स्मिता मुराळी ❋ अर्चना वासेकर-शेरजे ❋ पद्माकर जोंधळे ❋ शैलेष उकरंडे ❋ प्रा. अशोक सारडा ❋ बाळासाहेब तोरस्कर ❋ सौ. प्राजक्ता बोबडे ❋ सविता सामंत ❋ सुवर्णा जाधव ❋ सौ. गीता केदारे ❋ युवराज जगताप ❋ अर्चना देवधर ❋ हेमंत रत्नपारखी ❋ सौ. राजश्री लाहोर-ताठे ❋ श्रीम. सुनिता किरनळ्ळी ❋ प्रा. डॉ. अस्मिता नानोटी ❋ कुसूम चौधरी ❋ रवी तनपुरे ❋ श्रीमती निलोफर फणीबंद ❋ सौ. प्रिया सुरवसे ❋ एन. जे. पाटील ❋ वसावे निर्मलसिंग ❋ रेणुका पांचाळ ❋ सौ. जया नेरे ❋ सौ. प्रगती सोनटक्के ❋ रामचंद्र तुळसणकर ❋ सौ. किशोरी पाटील ❋ निर्मला देऊसकर ❋ विजया देशपांडे ❋ सौ. तृप्ती बांदेकर ❋ सौ. कविता दाते ❋ अरुणा कडू ❋ सौ. अश्विनी बोलके ❋ सौ. उषा राऊत ❋ सौ. माधुरी फालक ❋ डॉ. शीतल मालूसरे ❋ सौ. प्रज्ञा घोडके ❋ सौ. सुषमा सावंत ❋ रमाकांत राऊत ❋ पांडुरंग टेले ❋ सौ. प्रिया मयेकर ❋ संजय कांबळे ❋ डॉ. चंद्रकांत लेनगुरे ❋ हंसराज देसाई ❋ डॉ. अलका नाईक ❋ श्याम स्वामी ❋ पी. नंदकिशोर ❋ नवनाथ खरात ❋ डॉ. गीता वाळके ❋ विजया पाटील ❋ बबन धुमाळ ❋ संजय कुळये ❋ विवेकानंद मराठे ❋ पी. जी. ठाकूर ❋ सौ. ज्योती घंटेनवरु ❋ सौ. वर्षा पन्नासे ❋ सौ. स्नेहल तुळसणकर ❋ स्नेहलता कुलथे ❋ प्रदीप बडदे ❋ श्रीकांत वडकुते ❋ सौ. वंदना विंचुरकर (माळोकार) ❋ नीरज आत्राम ❋ रामदास देशमुख ❋ किशोर चलाख ❋ व्यंकटेश काटकर ❋ सौ. आर्या बागवे ❋ सौ. अपूर्वा शेटे ❋ अनंत बापट ❋ सुचिता कुलकर्णी (जोशी) ❋ सपना बांगर ❋ सौ. भारती सोळंके ❋ उज्ज्वला इंगळे ❋ सौ. अर्चना बागवे ❋ जयश्री सुतार ❋ कृष्णा शिंदे ❋ गजानन पाटील ❋ संदीप वाघोले ❋ राजेश चौरपगार ❋ श्याम चौकडे ❋ विजय बिन्दोड ❋ आनंद घोडके

**गझलधारा** (पृष्ठ क्र. ९५ ते ९७)

❋ जयवंत वानखडे ❋ प्रमोद भागवत ❋ कालिदास चवडेकर ❋ रवींद्र सोनवणे ❋ शांताराम हिवराळे ❋ उर्मिला बांदिवडेकर ❋ नारायण सोनवणे ❋ सौ. रझिया जमादार ❋ नवनाथ गाडेकर ❋ डॉ. सुभाष कटकदौंड ❋ डॉ. शरयू शहा ❋ स्मिता ढोनसळे ❋ साधना चौधरी ❋ सारिका पाटील ❋ मनीषा रायजादे-पाटील ❋ प्रतिभा चांदोरे ❋ डॉ. कमलाकर संख्ये

डॉ. सत्येंद्र राऊत, अणदूर
८२०८७४०८८०

स्त्री ही गृहलक्ष्मी आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत स्त्रीचा गौरव केला जातो. संसाररथाच्या दोन चाकांपैकी एक चाक म्हणजे स्त्री ज्ञेय. अनेक सुभाषितांतून, सुवचनांतून स्त्रीजातीचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो. भारतीय नारी शिक्षिका, डॉक्टर, वकील, उत्तम गृहिणी, पायलट, पोलिस, राजकारण, कृषी इत्यादी सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहे. म्हणूनभारतीय महिला ही कधी अबला नव्हतीच, भारत हा नवदुर्गेची पूजा करणाऱ्या संस्कृतीतील स्त्रीशक्तीचा देश आहे. प्रत्येक यशस्वी कर्तबगार पुरुषाच्या मागे एका स्त्रीचा सहभाग असतो, असे येथे म्हटले जाते. किंबहुना या समाजात घडलेले अनेक महापुरुष स्त्रीमुळे घडले. राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, मदर टेरेसा, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, कल्पना चावला, सुनीता विल्यम्स, पी. टी. उषा आणि इतरही अनेक कर्तृत्ववान महिलांनी या देशाचा नावलौकिक वाढविला आहे. राजमाता जिजाऊ होत्या म्हणून संस्कारमूर्ती व कीर्तिवंत छत्रपती शिवराय घडले. सावित्रीबाई फुलेंची साथ होती म्हणून जोतिबा फुले महात्मा झाले आणि मुळातच महिलांमध्ये निसर्गाकडून काही देणग्या पुरुषांपेक्षा जास्त आहेत. स्त्रीमध्ये सहनशीलता, नावीन्यता, सौंदर्याची जाणीव, बचत वृत्ती, संघप्रेरणा, स्मरणशक्ती हे गुण निसर्गतःच आहेत. स्त्री सृजनशील आहे. कारण निसर्गाने निर्मितीचा अधिकार स्त्रियांना दिला आहे. स्त्री मुळातच सबला आहे. जरी संविधानाने स्त्री व पुरुष यांना समान अधिकार दिले असले तरी भारताच्या पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री आज समाज व कुटुंबाच्या बंधनात अडकून पडली आहे. स्त्री ही आई, बहीण, पत्नीची भूमिका पार पाडत कौटुंबिक जबाबदारी समर्थपणे पेलत असते. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रिया पुरुषांवर अवलंबून असल्याने त्यांना स्वतःचा निर्णय घेण्याचा फारसा अधिकार नाही. त्यामुळे आजही त्यांचे स्थान नगण्यच असल्याने त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होताना दिसतो. आपल्या देशाची अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे. सरकारद्वारे मातृ दिवस, महिलादिन, बालिकादिन, जननी सुरक्षा अभियान असे कार्यक्रम महिलांसाठी राबविले जातात. त्यामुळे समाजात स्त्री शक्तीचे महत्त्व जाणवते.

समाजात आजही स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जात आहे. समाजात मोठ्या प्रमाणात प्रथा, रुढी यांतून संस्कारित असलेली समाजाची मानसिकताच जबाबदार आढळते. वारंवार मुलींना जन्म देणाऱ्या स्त्रियांना तर समाजाकडून सतत प्रतारणा सहन करावी लागते. मात्र गर्भजल परीक्षा विज्ञानाने दिलेली ही एक अद्भुत देणगी असून मात्र स्त्रीच्या अस्तित्वावरच घाव केला जातो. महिलांना लग्नानंतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते या प्रकारातील समस्या ह्या ग्रामीण व शहरी भागात वेगवेगळ्या असू शकतात तसेच वेगवेगळ्या पातळीवरील असू शकतात. सध्या आपण विज्ञान-तंत्रज्ञानासारख्या उच्च क्षेत्रात प्रगती केली, पण आजही आपले विचार खालच्या दर्जाचे आहेत. मुलगा न झाल्यास आई-वडील शोक करतांना दिसतात. महिलांना त्यांच्या मर्जी विरुद्ध गर्भ लिंगनिदान करायला लावतात व मुलगी झाली कि त्या महिलेला दोष दिला जातो. ज्याच्या पदरी पाप त्याला मुली आपोआप हीच भावना लोकांच्या मनात आहे. म्हणूनच स्त्री भ्रूणहत्या मोठ्या प्रमाणावर होत आहे आणि असंख्य मुक्या कळ्या या जगात पदार्पण करण्यापूर्वीच खुडल्या जात आहेत. आपल्या देशात स्त्री-पुरुष प्रमाणात निर्माण झालेला असमतोल समाजाच्या विकासाला कारणीभूत ठरतो. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, म्हातारपणाचा आधार, मुलगी म्हणजे परक्याचे धन यामुळे दिवसेंदिवस स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत कमी होताना दिसत आहे. २००१ च्या जनगणनेनुसार देशात १००० पुरुषांमागे ९३३ स्त्रियां असे स्त्री-पुरुष प्रमाण आहे ही फार मोठी शोकांतिका आहे. पुरुषप्रधान भारतीय संस्कृतीत जन्मतःच पुरुषवर्चस्व स्वीकारावयास लावून स्त्रियांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाची ओळखच नष्ट केली जाते. स्त्रिया नेहमीच समाजातील विकृत मनोवृत्तीच्या नराधमास बळी पडतात. बऱ्याचदा तर स्त्री पहिल्यांदा आपल्या आप्तस्वकियांच्याच अत्याचारास बळी पडत असते. छेडछाड, लैंगिक छळ, हुंडाबळी, एकतर्फी प्रेमातून हत्या व कुमारी माता बनल्याने आत्महत्या, बलात्कार, देवदासी इत्यादी अनेक प्रकार घडताना दिसून येतात आणि कुटुंबाची माणसे आरोपीकडून दबाव आणून मुखलेप झाला की न्यायदेवतेला साक्ष ठेवून सारे गप्प होतात! तर काहीजण घराण्याची प्रतिष्ठा, सामाजिक नीती अशा नाटकी बुरख्याखाली अत्याचारग्रस्त महिलेला लाथाडून देतात. कुटुंबाची ही अगतिकता तर समाजाची निर्दयी उदासीनता ! सारा समाज गेंड्याची कातडी लेवून बसलाय. कौटुंबिक हिंसाचारात हुंडाबळी, माहेरुन पैसे आणण्यासाठी मारहाण, मुले झाले नाहीत किंवा फक्त मुलीच झाल्या म्हणून शारीरिक त्रास, व्यसनी पती असल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी पडल्याने या समस्या कुटुंबाच्या दबावामुळे सर्वांसमोर येत नाही व पोलिस चक्रात कोण अडकायचं म्हणून पोलिसात तक्रार दिली जात नाही. स्त्रियांवरील अत्याचारास दूर करण्यासाठी शासनाने विविध कायदे तयार केलेले आहेत. राज्यघटनेतही विशेष कलमांचा समावेश आहे. मात्र स्त्रियांना न्याय देण्यासाठी अनेक कायदेही त्रोटक पडत आहेत. नवरात्रोत्सवाचे नऊ दिवस म्हणजे स्त्रीशक्तीचा जागर. समाजात महिलांना स्वायत्तता, सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाचे अभियान राबविण्यास सुरुवात केली जाते ज्यामुळे आपण तिला सबला बनविण्याचा प्रयत्न करत आहोत आणि खरंच महिलांचे सबलीकरण होते आहे का ? त्यांना दुय्यम स्थान का दिले जाते आणि त्यांचे अधिकार व विकास यापासून त्यांना पूर्णपणे का दूर केले जाते? तरी सुद्धा येथे स्त्री-

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

पुरुष समानतेच्या गोष्टी बोलल्या जातात. आज महिला सबलीकरण करताना सर्वप्रथम समाजात महिलांना अधिकार दिले पाहिजे. महिलांवर घात करणाऱ्या विघातक प्रवृत्ती अर्थात् हुंडा प्रथा, स्त्री भ्रूणहत्या, निरक्षरता, लैंगिक अत्याचार, असमानता इत्यादींचा नाश करणे गरजेचे आहे. आपल्यासमोर महिलांचे अनेक प्रश्न व त्यावर उपचार म्हणून समाजात महिलांना स्वायत्तता, सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाचे अभियान राबविण्यास सुरवात करावेत. लैंगिक भेदभाव नष्ट करून समानता प्रस्थापित करणे तसेच सामाजिक, घरगुती अन्याय व अत्याचार यांच्याविरुद्ध कठोर कायदे व उपाययोजना करणे, त्याचबरोबर महिलांना शारीरिक, सामाजिक, आर्थिक व मानसिक स्वरूपात सशक्त बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे. अशा प्रकारे महिला सबलीकरण करणे म्हणजे पुरुषांना हिणवणे किंवा त्यांच्यापेक्षा श्रेष्ठता सिद्ध करणे असे नव्हे, तर फक्त महिलांना त्यांच्या नैसर्गिक गुणधर्म, क्षमता, परंपरा यांच्यासह समानतेने वागविणे होय. असा विचारप्रवाह समाजात प्रस्थापित झाला तर खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण होईल. स्त्रीशक्तीच्या रूपात देशात असलेले मनुष्यबळ विकसित करून स्त्रीशक्तीचे आरोग्य, शिक्षण, संस्कार व स्वालंबन हे चार आधारस्तंभ समाजाने भक्कम केले तर समाजात सुराज्य व स्वराज्य दिसेल आणि हे फक्त अभियानापुरते कागदोपत्री नाही, तर वास्तवात महिला सबलीकरण व्हायला हवे. आपल्या भारत देशाला पूर्ण विकसित बनवण्यासाठी व परिपूर्ण विकासाचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी महिला सबलीकरण खूप महत्त्वाचे ठरेल.

महिला ह्या शिक्षणाच्या क्षेत्रात आजही मागे आहेत. आजही ग्रामीण भागात शिक्षणासाठी पाठवले जात नाही. मुलींना शिकून काय करायचं हाच विचार आपल्या समाजात रुजला आहे पण महिलांना शिक्षण दिले तर त्या आपल्या कुटुंबा बरोबरच देशाचाही विकास करु शकतात. एक महिला शिकली तर एक कुटुंब शिकते म्हणून स्त्रियांनीसुद्धा साक्षर व्हावे यासाठी सावित्रीबाई फुले यांनी अपार कष्ट घेतले. अनेक संकटांना तोंड दिले. समाजकंटकाचा त्रास सहन केला. कारण एक सुशिक्षित स्त्रीच घरातील अनेकांच्या अंतःकरणात ज्ञानाचा दिवा लावू शकते. ही गोष्ट ओळखून सावित्रीबाई फुले यांनी मुलींची शाळा काढली. यातून गार्गी, मैत्रेयीप्रमाणे आजकालच्या महिलांनी स्फूर्ती घेऊन काम केले पाहिजे. भारतीय स्त्री जीवनाचा गेल्या हजारो वर्षांपासून जीवनपट नजरेसमोर साकारलेला दिसतो अन् एका टोकाला स्त्री स्वात्यंत्र्यम् न अर्हति 'हा काळा पदर विणलेला दिसतो; तर दुसऱ्या पदरावर' यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः। ही भरजरी वीण झळकते. महिलांसाठी सरकारने विविध शैक्षणिक योजना आणल्या आहेत पण जो पर्यंत समाजाची मानसिकता बदलत नाही तो पर्यंत त्या योजनांचा फायदा महिलांना मिळणार नाही. महिला फक्त चूल आणि मूल यासाठीच या मानसिकतेतून आता समाजाने बाहेर पडले पाहिजे. २१ व्या शतकातील तरुणींनी डोळसपणे साक्षर होऊन ग्रामीण व शहरी भागातील गोरगरीब, महिलांना साथ देण्याची गरज आहे. तेव्हाच स्त्रियांचा दर्जा, कुटुंबा-कुटुंबातील नाती व पर्यायाने समाजात उंचावेल. स्त्री कार्याची महती सांगणारा इतिहास यादीत जमा न राहता सप्तरंगी वर्तमानकाळात दिसून येईल. सामाजिक मूल्ये टिकवून ती जोपासण्यासाठी कायद्याची गरज आहे. महिलांना त्यांच्या हक्कांची, अधिकारांची जाणीव असलीच पाहिजे. तरच त्या स्वतःचा विकास करू शकतात. भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुषांना समान हक्कांची हमी वर दिलेली आहे आणि स्त्रियांकडे झुकता कल ठेवला आहे. परंतु जर स्त्रीला तिच्याविषयी असलेल्या कायद्यांसदर्भात ज्ञानच नसेल तर ती तिच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध ती लढा कसा देऊ शकेल?

आजची सुशिक्षित स्त्री आपल्या नोकरी व्यवसायातील सर्व त-हेची काम यशस्वीपणे पार पाडते आणि पालक म्हणून मुलांच्या अभ्यासाची जबाबदारी थोडीफार उचलते. एकाचवेळी एवढी कामे करत असताना ती थकून जाते, तिची दमछाक होते. एवढे सर्व करून तिच्या पदरी निराशा येते. कौटुंबिक कार्यक्रम असेल तर नोकरी करणाऱ्या स्त्रीला आठवडयापूर्वीच रजा घेऊन सर्व तयारी करावी लागते. या कामात तिला सर्वच जण मदत करतीलच असे नाही. स्त्री ही गृहिणी असो की नोकरी करून घर सांभाळणारी असो कौटुंबिक व धार्मिक, सणवार, उत्सव या सर्व गोष्टींचा बोजा तिच्यावर पडतो. स्त्रीचं जीवन म्हणजे पतीच्या चरणावर भक्तिभावानं आणि श्रध्देनं समर्पित केलेलं एक कमलपुष्प असतं! पतीचं सौख्य तेच तिच सौख्य, पतीच्या जीवनाची अर्धी बाजू सावरण्याची पवित्र शपथ तिनं सप्तपदीच्या मंगलवेळी अग्निनारायणाला साक्षी ठेवून घेतलेली असते. म्हणूनच तिला अर्धांगी म्हटलं जातं,

'क्या कर नहीं सकतीं भला यदि शिक्षिता हों नारियाँ ?
रणसंग्राम, राज्य, सुधर्म-रक्षा, कर चुकीं सुकुमारियाँ ।
लक्ष्मी, अहिल्या, जिजाऊ, भवानी, पद्मिनी
ऐसी अनेकों आज गिनी जा सकती हैं देवियां ।।

जीवनामध्ये प्रत्येक माणसाला संघर्ष तर करावाच लागतो. काही जण रडतखडत हा संघर्ष करतात तर काही स्त्रिया हाच संघर्ष सुवर्णसंधी मानून दृढनिश्चयाने त्या संघर्षरुपी संधीचे स्वागत करून पुढे जातात आणि त्यांना त्यात यश निश्चितच मिळत असते.

प्रजानार्थ महाभागाः पूजा गृहदीप्तयः ।
स्त्रियः श्रियश्च गेहेषु न विरोधोऽस्ति कश्चन् ।।

स्त्रिया संतती देणाऱ्या महाभाग्यशाली, पूजनीय, घराला प्रकाश देणाऱ्या, घराची संपत्ती असतात म्हणून स्त्रियांविषयी कोणाचा विरोध असू नये.


भार्यावन्तः क्रियावन्तः सभार्या गृहमेधिनः ।
भार्यावन्तः प्रमोदन्ते भार्यावन्तः श्रियान्विताः ।।

उत्तम भार्या ज्याला प्राप्त झाली तोच लक्ष्मीवान मानला जात असे. म्हणून स्त्रीला प्रसन्न ठेवण्याचा आदेश दिलेला आहे. स्त्री प्रसन्न असेल तरच पुरुषाला उत्तम संतानप्राप्ती होऊ शकते. म्हणून स्त्रियांचे नेहमीच लाड, कौतुक करावे. त्यांची पूजा केली तर देवता त्या घरी रमतात आणि त्यांचे जेथे पूजन होत नाही तेथे सर्व क्रिया निष्फळ ठरतात. अशा प्रकारे प्राचीन ग्रंथांनी स्त्रियांविषयी अनेक चांगले नियम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्री जन्मा ही तुझी कहाणी हृदयी अमृत नयनी पाणी असं सद्यस्थितीत ध्वनित होत आहे. स्त्रियांचा आर्थिक

पान ४१ वर

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

# चला करूया निर्धार
# देऊ दिव्यांगांना आधार



**शास्तूर येथील निवासी दिव्यांग शाळेतील बालचमूंसोबत काव्यप्रेमी...**

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

